खुशखबरी असो तुम्हाला दोन नुर ची जे तुम्हाला प्रदान करण्यात आले आहे तसे यापुर्वी कोणत्याच पैगंबराला देण्यात आले नव्हते: १} सुरस फातीहा. २}सुरह बकरा ची शेवटची दोन आयात, तुम्ही या दोन प्रकाशां पैकी कोणतेही [शब्द] हुरुफ तिलावत [वाचन] केल्याने वाचणाऱ्याला खुप नेकी व पुण्य मिळेल तसेच ते सुद्धा मिळेल ज्याची तुम्ही दुआ [याचना] केली असेल

अब्दुल्ला बिन अब्बास अल्लाह त्याच्यावर प्रसन्न होऊ कथन करतात की : <>.
[صحيح] [رواه مسلم]

जिब्राईल अलैसलाम प्रेषितांसोबत [सलामती असो त्यांच्यावर]बसले असतांना, आकाशातुन एक आवाज ऐकु आला, जसे कुणी दरवाजा उघडतांना आवाज ऐकु येतो, हा दरवाजा पहिल्यांदा उघडल्या गेला नव्हता, या दरवाजातून एक फरिश्ता दुत आला, जो पहिले कधिच जमीनीवर उतरला नव्हता, त्याने सर्वप्रथम प्रेषितांना[अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर] सलाम सादर केला, तदनंतर त्याने प्रेषितांना [अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर] शुभवार्ता दिली की साक्षात अल्लाह ने तुम्हाला दोन अप्रतिम [भेट] देणग्या प्रदान केल्या, आणी या दोन ची तिलावत [वाचनावर] नेहमीच भलाई व दुआ चा स्वीकार होतो.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/5775